# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 20/08/2020 (गुरूवार)
(सकाळ)

---

### खून

पो.स्टे. खापरखेडा :— अंतर्गत 07 कि. मी अंतरावर डब्लुसिएल सिल्लेवाडा येथे दिनांक 11/08/2020 चे 17.00 वा. ते 17.30 वा. दरम्यान मोहम्मद उर्फ लाली जाहीद हसन खान(मृतक), वय 33 वर्ष याने आरोपी नामे— 1) सिद्धनाथ राममिलन यादव, वय 24 वर्ष, रा. वार्ड क 4 तट्टालाईन झोपडपटटी डब्लुसीएल कॉलनी सिल्लेवाडा याचे 11,000/— रू. हिसकाऊन घेतले. या कारणावरून आरोपी क्र. 1) सिद्धनाथ यादव व 2) अमरनाथ नंदलाल यादव, वय 22 वर्ष यांनी मोहम्मद उर्फ लाली जाहीद हसन खान यास लाकडी काठीने त्याचा जिव घेण्याच्या उद्देशाने डोक्यावर मारून जिवानीशी ठार केले. तसेच मृतकचा लहान भाऊ जुबेर हसन खान, वय 20 वर्ष याला सुध्दा मारून गंभीर जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— सन्नो जाहीद हसन खान, वय 26 वर्ष, रा. डब्लुसीएल कॉलनी सिल्लेवाडा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे.खापरखेडा येथे आरोपीतांविरुध्द कलम 302, 307, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि मेश्राम मो.क्र 9423115260 हे करीत आहे.

### घरफोडी

1) पो.स्टे. काटोल :— अंतर्गत 1 कि.मी अंतरावर देशमुखपुरा काटोल येथे दिनांक 02/06/2020 चे 14:30 वा. ते दिनांक 19/08/2020 चे 08:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे— प्रमोद मलखांमराव देशमुख, वय 57 वर्ष, रा. देशमुखपुरा काटोल हे घराचे दाराला कुलुप लावुन नागपूर येथे मुलाच्या घरी निघुन गेले होते व मुलाकडे मुक्कामी होते. दि. 19/08/2020 सुमारे 08.30 आरोपीने फिर्यादीचे घराचे दाराचे कुलूप कोणत्या तरी वस्तुने उघडुन त्यांचे घरात प्रवेश करून घरातील दोन बेडरूम मधील लोखंडी कपाट व लाकडी कपाटात ठेवलेले चांदिचे दागिने कि. 32,300/—रू., एच.पी गॅस खाली सिलेन्डर कि. 1,000/—रू. व नगदी 12,000/—रू. असा एकुण कि. 45,300/—रू. मुद्देमाल चोरून नेला. तसेच त्यांचे घराचे दार त्याचे अवस्थेत लावुन पळुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 454, 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवा अरूण भेंडे 9923193642 हे करीत आहे.

2) पो.स्टे. कोंढाळी :— अंतर्गत 7 कि.मी अंतरावर मौजा पंचधार ता. काटोल जि. नागपूर येथे फिर्यादी नामे— सौ. वंदना हिरामजी निकोसे, वय 46 वर्ष, रा. पंचधार ता. काटोल जि. नागपूर हि दि. 16/08/2020 चे 12.00 वा. ते दि. 19/08/2020 चे 19.00 वा. सुमारास आपले परिवारासह तिचे भावाचे घरी कारंजा घाडगे येथे आपल्या घराला कुलुप लावुन गेली होती. तसेच ती दि. 19/08/2020 रोजी परिवारासह सायंकाळी 19.00 वा. घरी परत आली असता फिर्यादीचे घराचे दाराचा अज्ञात आरोपीने कुलुप तोडुन घरात प्रवेश केला. त्यानंतर आरोपीने घरातील लॉकरमधुन सोन्याचे दागिने असा एकूण किंमती 1,09,000/— रू. चा मुद्येमाल चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम 454, 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. राम ढगे 9518979499 हे करीत आहे.

## अवैधरीत्या धारदार व घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत मौजा खापरखेडा येथे दिनांक 19/08/2020 चे 14.30 वा. ते 15.00 वा. दरम्यान आरोपी नामे– मुन्ना उर्फ विजय ओमप्रकाश शाहु, वय 39 वर्ष, रा. खापरखेडा याने स्वतः जवळ कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने विनापरवाना अवैधरीत्या हातात शस्त्र(तलवार) घेवुन गावात दहशत निर्माण करतांना मिळुन आला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस हवा उमेश ठाकरे, पोस्टे. खापरखेडा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 4, 25 भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार कोकाटे हे करीत आहेत.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– अंतर्गत कटरे हाऊसिंग सोसायटी टाकळघट येथे दिनांक 19/08/2020 चे 15.00 वा. दरम्यान विजय भारत ताजने, वय 48 वर्ष व 2) रणजित योगेन्द्र सहारे, वय 38 वर्ष, दोन्ही रा. टाकळघाट याचे आपले पत्नीसोबत मटनाच्या भाजीत मसाला का टाकला नाही या कारणावरुन वाद करुन घराबाहेर निघून जावून शेतातील विहीरीत उडी मारली व पाण्यात बुडून मरण पावला. त्याला वाचविण्यासाठी 2) रणजित योगेंद्र सहारे वय 38 रा. कटरे हाउसिंग सोसायटी टाकळघाट याने विहीरीत उडी मारली असता तो सुध्दा पाण्यात बुडून मृत्यु पावला.

सदर प्रकरणी सरतर्फे क्रिशणा विजय ताजने, वय 18 वर्ष, रा. कटरे हाउसिंग सोसायटी टाकळघाट यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार प्रमोद बनसोड 9673608342 हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत वार्ड क्र. 1 चिचोली खापरखेडा येथे दिनांक 18/08/2020 चे 17:00 वा. ते 21.00 वा. पुर्वी रोशन मुलचंद भाटे, वय 34 वर्ष, चिचोली वार्ड क्र. 1 याने त्याच्या राहत्या घरी अज्ञात कारणावरून लोखंडी रॉडला रेशमी कापडाने गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला. मेयो हॉस्पीटल येथुन कागदपत्र प्राप्त झाल्याने सदरचा मर्ग नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– मुलचंद प्रसाद भाटे, वय 50 वर्ष, रा. चिचोली वार्ड क्र. 1 यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. खापरखेडा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सफौ रामेश्वर कटरे 9922420496 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर